# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १९/०९/२०२४ (गुरूवार) सायंकाळ**

---

## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

## पोलीस स्टेशन खापाची कार्यवाही

दिनांक १८/०९/२०२४ रोजी पोलीस स्टेशन खापा येथील स्टाफ खापा हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरव्दारे खबर मिळाली की, पंजाब खैरी शिवारातील येथील ढोल नाला येथे **आरोपी** हा खापा ते पारशिवनी रोडवरील पंजाब खैरी शिवार येथील ढोल नाला असलेल्या नाल्यात एक ट्रॅक्टर उभा होता व त्यामध्ये तिन इसम हे नाल्यातून रेतीची चोरी करून ट्रॅक्टर मध्ये भरतांना दिसुन आले. सदरचे ट्रॅक्टर मध्ये रेती भरणाऱ्या इसमांनी पोलीस आल्याचे पाहुन पसार झाले असता त्यापैकी एक **आरोपी नामे– युवराज श्रावनजी सिरसाम वय ४० वर्ष रा. कोरमेटा ता. सावनेर जि नागपुर** हा घटनास्थळी हजर मिळुन आला. घटनास्थळाहुन लाल रंग महीद्रा ४७५ डी आय सरपंच या कंपनीचा क्र. ट्रॅक्टर की ४,००,००००/–रू. महींद्रा ट्रॉली किंमती १,००,०००/–रू. अर्धा ब्रास रेती किंमती १५००/– रू दोन लोखंडी फावडे किंमती ४००/–रू. दोन प्लास्टीक घमेले किंमती २००/–रू. असा एकुण ५०२१००/– रू मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी नामे– सरतर्फे पोउपनि प्रमोद बन्सोड पोस्टे खापा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीतांविरुध्द कलम ३०३(२),३(५),४९ बि.एन.एस २०२३, ४८(७), ४८(८) म.ज.म.स १९६६, ४,२१, खाण आणी खनिज अधि १९५७, ३ सार्वजनीक संपत्ती नुक्सान प्रतीबंधक अधिनीयम १९८४ कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे खापा येथील ठाणेदार पोनि विशाल गिरी यांचे नेतृत्वात पोउपनि प्रमोद बन्सोड, पोउपनि सचिन जंगम, पोअं. पन्नालाल बटाउवाले, चालक सफौ जयेंद्र शिर्के यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर